महाराष्ट्र शासन

आयुक्त, अन्न् व औषध प्रशासन

महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जाहिरात क्रमांक १/२०२४

आयुक्त अन्न व औषध प्रशासनातील कार्यरत प्रयोगशाळांमध्ये (मुंबई /नागपूर /छत्रपती संभाजीनगर) विभागातील विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ (गट-ब) (अराजपत्रित) व वरिष्ठ तांत्रिक सहायक (गट-क) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. वरिष्ठ तांत्रिक सहायक : पदसंख्या व त्या पदांकरीता विहित आरक्षण

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.व शै. मा. वर्ग (SEBC) | आर्थिक दुर्बल घटक (EWC) | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वरिष्ठ तांत्रिक सहायक | ५ | २ | १ | १ | २ | ० | १ | ६ | ४ | ४ | २६ | ११ | ३७ |
| समांतर आरक्षण | रिक्त् जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | ० | १ | २ | २ | २ | १२ | ३ | १५ |
| महिला आरक्षण ३०% | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ०८ | ३ | ११ |
| माजी सैनिक १५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ०४ | २ | ०६ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ०२ | १ | ०३ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | | ० |
| दिव्यांग | १ | | | | | | | | | | | | |
| एकूण | ५ | २ | १ | १ | २ | ० | १ | ६ | ४ | ४ | २६ | ११ | ३७ |

दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे-

| | | |
|---|---|---|
| दिव्यांगत्व | स्वमग्नता ASD- Autism Spectrum Disorder (M-Mild, MoD-Modrate) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (ID- Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण आक्षमता (SLD-Specific Learning Disability)/ मानसिक आजार (MI-Mental Illness) (गट-ड/इ) | बहिरेपणा (D-Deaf) व एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व ( MD-Multiple Disabilities) टिप - अंधत्व (B-Blind) व अल्पदृष्टी (LV- Low Vision) प्रकारचे दिव्यांग वगळून |
| आरक्षित पदे | १ | |

२. विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ, गट-ब (अराजपत्रित) : पदसंख्या व त्या पदांकरीता विहित आरक्षण

| प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.व शै. मा. वर्ग (SEBC) | आर्थिक दुर्बल घटक (EWC) | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ | १ | १ | १ | १ | १ | ० | ० | ४ | ०२ | ०२ | १३ | ०६ | १९ |
| समांतर आरक्षण | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ३ | १ | १ | ९ | ४ | १३ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ४ | २ | ०६ |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | १ | | | | | | | | | | | | |
| एकूण | १ | १ | १ | १ | १ | ० | ० | ४ | २ | २ | १३ | ६ | १९ |

दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे -

| दिव्यागंत्व | कर्णबधिरता अथवा ऐकु येण्याकरीता दुर्बलता (गट-ब)<br>(D- Deaf, HH-Hard Hearing) |
|---|---|
| आरक्षित पदे | १ |

टिप -

१) भरावयाच्या उपरोक्त संवर्ग /पदांचा सामाजिक /समांतर आरक्षणात तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
२) वरील राखीव /बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.
३) उपरोक्त रिक्त पदांपैकी काही पदे ही शासन नियमानुसार अनाथांसाठी व दिव्यांगांसाठी आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

- सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर अन्वये दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील मा. न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येतील.

* वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी २३.५९ पर्यत |
| २. | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजी २३.५९ पर्यत |
| ३. | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. |

टिप-

१. विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ (गट-ब) अराजपत्रित व वरिष्ठ तांत्रिक सहायक (गट-क) या दोन पदांसाठी ऑनलाईन परीक्षा स्वतंत्रपणे स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येतील. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्यावावत वेळोवेळी विभागाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

२. उमेदवारांच्या संख्येस अनुसरून आवश्यकतेनुसार वेगवेगळया सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येतील.

* वयोमर्यादा :-

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी / सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील) तसेच दिव्यांग व अनाथ उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. तसेच पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी ५५ वर्षे इतकी वयोमर्यादा राहील व भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी शासन निर्णयात नमूद प्रमाणे ४५ वर्षे इतकी वयोमर्यादा राहील.

२) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

* सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता –

| अ.क्र | पदनाम, गट व वेतन संरचना | आवश्यक शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|
| १ | विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ (गट-ब) अराजपत्रित Analytical Chemist<br><br>S-14: **38600 - 122800** अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे इतर देय भत्ते. | **(i) Possess a Degree in Pharmacy Or A Post-Graduate Degree in Chemistry or Bio-Chemistry of recognized University.**<br>(मान्यताप्राप्त विद्यापीठाची औषध निर्माणशास्त्र शाखेची पदवी किंवा रसायन शास्त्र **(Chemistry)** किंवा जीव-रसायनशास्त्र **(Bio-Chemistry)** पदव्युत्तर पदवी (मास्टर डिग्री)<br>OR | अनुभवाची आवश्यकता नाही |
| | | **(ii) Possess a Degree in Science in Second Class of any recognized University and have Experience, gained after obtaining such degree in the analytical of drugs for not less than eighteen Months.**<br>किंवा<br>(मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची व्दितीय श्रेणीमधील पदवी. अशी पदवी प्राप्त केल्यानंतर औषधी द्रव्ये विश्लेषणाचा किमान १८ महिन्यांचा अनुभव आवश्यक) | अशी पदवी प्राप्त केल्यानंतर औषधी द्रव्ये विश्लेषणाचा किमान १८ महिन्यांचा अनुभव आवश्यक |

| अ.क्र. | पदनाम, गट व वेतन संरचना | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| २. | वरिष्ठ तांत्रिक सहायक, (गट-क) Senior Technical Assistant **S-13 : 35400 - 112400** अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे इतर देय भत्ते. | **(i) Have a Second Class science Degree of a recognized University. OR**<br>(मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची व्दितीय श्रेणीमधील पदवी ) किंवा<br>**(ii) Hold a Degree in Pharmacy.**<br>(औषध निर्माण शास्त्र पदवीधारक) |

टिप - प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास उमेदवाराने संबंधित किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

परीक्षा शुल्क :-

| | |
|---|---|
| अराखीव (खुला) प्रवर्ग- १०००/- | राखीव प्रवर्ग - ९००/- |
| उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बॅक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील. | |
| माजी सैनिक यांना शुल्क आकारले जाणार नाही. | |

ईतर सूचना -

- प्रस्तुत जाहिरात ही परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त जाहिरात असून अर्ज स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, परीक्षेच स्वरुप, परीक्षा शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया यावावतचा सविस्तर तपशील दिनांक १८ सप्टेंबर, २०२४ रोजी www.fda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील "सर्वसाधारण सूचना" या सदरामध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे त्याचे कृपया अवलोकन करावे.

- भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.fda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वदल करणे यावावतचे सर्व अधिकार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना तसेच आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील व या संदर्भातील त्यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

सही /-
(रमेश राठोड)
सदस्य सचिव,राज्यस्तरीय निवड समिती, मुंबई
तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, मुख्यालय, मुंबई

सही /-
(दादाजी गहाणे)
अध्यक्ष, राज्यस्तरीय निवड समिती, मुंबई
तथा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुख्यालय, मुंबई